महाराष्ट्र शासन

# छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर

भाऊसिंगजी रोड,दसरा चौक, कोल्हापूर-४१६००२

दुरध्वनी :- 0231 - 2641583 ई-मेल:- est3cprhospitalkolapur@gmail.com

जा.क्र.छप्रासरुको/आस्था-३/कंत्राटीपदेजाहिरात/मानसोपचारसमुपदेशक/ 1727 /२६ दि. 06/03/२०२६

## -: कंत्राटी पदभरती जाहिरात:-

अधिष्ठाता, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर यांच्या महात्मा फुले जन आरोग्य योजनांतर्गत छात्रमानस योजनेतून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य सबलीकरणाकरीता "छात्रमानस कक्ष" करीता कंत्राटी तत्तावर **"मानसोपचार समुपदेशक"** पदाकरीता थेट मुलाखती/ शैक्षणिक गुणक्रमाव्दारे खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे उमेदवार भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कंत्राटी पदनाम | शैक्षणिक अर्हता | एकूण संख्या | वयोमर्यादा | दरमहा एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | **मानसोपचार समुपदेशक** | **MA (Counselling Psychology), MA (Clinical Psychology), PSW(Psychiatric Social Worker)** वरील शैक्षणिक अर्हतेचे उमेदवार न मिळाल्यास MSW उमेदवारांचा विचार करण्यात येईल.<br>**शैक्षणिक अर्हता:-**<br>१.UGC मान्यताप्राप्त विद्यापीठे तसेच महाविद्यालये येथून पदव्युत्तर पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्राध्यान्य देण्यात येईल.<br>२.RCI मान्यता प्राप्त पदव्युत्तर पदवी ग्रहण केलेल्या उमेदवारांना प्राध्यान्यक्रम देण्यात येईल.<br>३.विद्यार्थ्यांचे समुपदेशनाचा किमान १ वर्षाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारांना प्राध्यान्य देण्यात येईल.<br>४. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेची जाण असणे आवश्यक | ०२<br>पुरुष-१<br>स्त्री-१ | वय वर्षे १८ ते ३८ पर्यंत फक्त (दि. ३१.०३.२०२६) | रु.३०,०००/- (अक्षरी रुपये तीस हजार फक्त) |

सूचना:- वरील पदे ही निव्वळ तात्पुरत्या व कंत्राटी स्वरुपाची असून सदर पदभरतीबाबत विस्तृत सूचना अटी व शर्ती www.rcsmgmc.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

**सर्वसाधारण अटी व शर्ती:-**

1. **उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून नियुक्ती दिनांकापासून अकरा महिन्यांसासाठी (११ महिन्यांसाठी) वैद्य राहील.**

Scanned with OKEN Scanner

२. जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू राहणार नाही तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३. अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४. उपरोक्त कंत्राटी पदासाठी दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५. अनुभव व उच्च शैक्षणिक अर्हता धारक उमेदवारांना प्राध्यान्य देण्यात येईल.

६. उमेदवारांची संख्या जास्त असल्यास मुलाखत घेण्यात येईल व उमेदवारांची संख्या कमी असल्यास शैक्षणिक गुणाक्रमानुसार निवड करण्यात येईल.

७. निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी रा.छ.शा.म.शा.वै.महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोप्चार रुग्णालय, कोल्हापूर कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल याबाबत कोणत्याही प्रकारचा स्वंतत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

८. जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा ही वय वर्षे १८ ते ३८ वर्षे इतकी राहील.

९. उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन अर्हताप्राप्त उमेदवारांना दूरध्वनीव्दारे संपर्क करुन मुलाखतीस बोलाविण्यात येईल.

**१०. सदर पदासाठी RCI मान्यता प्राप्त पदव्युत्तर पदवी ग्रहण केलेल्या उमेदवारांना प्रथम प्राध्यान्यक्रम देण्यात येईल.**

११. निवड झालेला उमेदवार नियुक्तीनंतर काही कारणास्तव कामावर रुजू न झाल्यास अथवा रुजू झाल्यानंतर मूदतपूर्व पद सोडावयाचे असल्यास उमेदवाराने तशी पूर्वसूचना एक महिना अगोदर संबंधीत अधिकाऱ्यास देणे बंधनकारक राहिल. अथवा एक महिन्याचे वेतन शासनास जमा करणे बंधनकारक राहिल तसेच अशा परिस्थितीमध्ये प्रतिक्षा यादीतील उमेदवारास गुणानुक्रमे सदर पदावर नियुक्तीस प्राध्यान्य देण्यात येईल व त्याकरीता वेगळी जाहिरात देण्यात येणार नाही.

१२. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड (भरती) प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर भरती प्रक्रिया स्थगित करणे/ रदद करणे पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. अधिष्ठाता रा.छ.शा.म.शा.वै.महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर यांचे स्तरावर राखून ठेवण्यात आलेले आहेत याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

**१३. उमेदवारांने विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीसह आपले अर्ज श्री. प्रथमेश शिंदे, कनिष्ठ लिपीक वेतन देयक विभाग वर्ग १ ते ४, शेंडा पार्क, कोल्हापूर व श्री. कासीम पठाण, वरिष्ठ लिपीक आस्थापना वर्ग-३ शेंडा पार्क, कोल्हापूर येथे दि.१०/०३/२०२६ ते दि. १७/०३/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत सुटटीचे दिवस वगळून व्यक्तीश: सादर करावेत. तसेच मुलाखतीकरीता दिनांक १८.०३.२०२६ रोजी दुपारी ११.०० वाजता महाविद्यालयीन परिषद कक्ष,शेंडा पार्क, कोल्हापूर येथे उपस्थित राहावे.**

१४. उमेदवारांना निवडीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच उमेदवारांना कोणताही प्रवासभत्ता किंवा इतर कुठलाही भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

सदरहू भरती प्रक्रियेकरीता उमेदवारांनी अर्ज सादर करणेसाठी अंतिम मुदत दिनांक /०३/२०२६ अखेर राहणार आहे. तदनंतर छाननी, मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे हरकती आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रितसर शासनाच्या तसेच अधिष्ठाता, रा.छ.शा.म.शा.वै.महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोप्चार रुग्णालय, कोल्हापूर यांच्या प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरतीप्रक्रिया पार पाडून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशील वेळोवेळी नोटीसबोर्डवर अधिष्ठाता, रा.छ.शा.म.शा.वै.महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोप्चार रुग्णालय, कोल्हापूर व www.rcsmgmc.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल याची सर्व उमेदवारांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

*खालील प्रमाणे आवश्यक असलेल्या मूळ कागदपत्राच्या साक्षांकित केलेल्या प्रती अर्जाच्या नमुन्यासोबत जोडाव्यात.

अ) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका

ब)शाळा सोडल्याचा /जन्मतारखेचा दाखला

क) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र

ड) पासपोर्ट आकाराचे २ फोटो

इ) शासकीय अनुभव असलेला दाखला

ई) Rehabilitation Council of India (RCI) कडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र

अधिष्ठाता,
राजर्षी छत्रपती शाहू महाराज
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार
रुग्णालय, कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner